चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२७ ऑगस्ट, २०१९

: 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# पुराच्या पाण्यात अडकलेल्या ४० ते ५० इसमांची सुखरूप सुटका
# चिमुर पोलीसांची धाडसी कामगीरी

जिल्हयात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे लहान मोठे नदी, नाले, तळे तुडुंब भरून वाहत आहे त्यामुळे जनजिवन सुध्दा विस्कळीत झाले आहे. पोलीस विभाग सुध्दा पावसाळयात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीपासुन बचाव करण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर सतर्क व सज्ज आहे.

दिनांक २६/०८/२०१९ रोजी दुपारी ०३ ते ०४ वाजता दरम्यान पोलीस स्टेशन चिमुर येथील पोलीस पथक चिमुर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, सतत सुरू असलेल्या पावसामुळे चिमुर तालुक्यातील ग्राम चिखलेपार या गावाला पावसामुळे पुराच्या पाण्याने वेळा घातला असुन जवळपास ४० ते ५० ग्रामस्थ पुराच्या पाण्यात अडकलेले आहे. अशी माहिती मिळताच चिमुर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. स्वप्नील धुळे हे आपल्या पोलीस पथकासह कोणताही विलंब न लावता तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळावर पोहचुन पाहणी केली असता चौहीकडे शेतशिवारातुन पाणी वाहत होते. पुराच्या पाण्याने वेळलेल्या गावापर्यंत पोहण्याकरीता कोणताही मार्ग दिसत नसल्याने पोलीस पथक कसे बसे शेतशिवरातुन, बांध्यातुन ४ ते ५ किमी. पायदळ चालत गेले. चालत चालत गावाच्या जवळपास पोहचले असता, संपुर्ण परिसर पाण्याने तुडुंब भरून होते. पोलीस पथक आणि एसडीएम चिमुर यांनी तात्काळ चंद्रपुर येथे संपर्क करून बोट बोलावुन घेतली. आणि शेवटी पाण्यात अडकलेल्या त्या ग्रामस्थांना सुखरूप बाहेर काढण्यात पोलीसांना यश आले आहे.

सदरचे बचावकार्य पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, चिमुर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. स्वप्निल धुळे, पोउपनि. राजु गायकवाड, किरण मेश्राम, पोहवा. विलास निमगडे, पोना. किशोर बोढे, पोशि. विनायक सुरकुंडे, कुनाल राठोड, सचिन साठे, रवि आठवले, मपोशि उज्वला परचाके यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता महत्वाची भुमिका बजाविली आहे.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२७ ऑगस्ट, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# झुम कार या ॲप्स्द्वारे वाहन बुक करून दारू तस्करी करणारे आरोपी वरोरा पोलीसांच्या जाळयात

## ०५ आरोपीसह १८ लक्ष १३ हजाराचा मुद्देमाल जप्त

दिनांक २७/०८/२०१९ रोजी पोलीस स्टेशन वरोरा येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम दोन चारचाकी वाहनाने नागपुर ते वरोरा मार्गे चंद्रपुर कडे अवैध रित्या दारूची तस्करी करणार आहे. अशा माहिती वरून वरोरा पोलीसांनी नंदोरी टोल नाक्याजवळ नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी करीत असतांना, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक मारूती ब्रिझा आणि एक महिंद्रा केयुव्ही वाहन येतांना दिसले. सदर वाहनास संशयावरून थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता दोन्ही वाहनामध्ये अवैध रित्या दारूचा साठा दिसुन आला. सदर मालाची तपासणी केली असता १) मारूती ब्रिझा वाहन क्र. एम एच ४३ बीजी ९६१९ मध्ये देशी दारूच्या १००० निपा, किं. १,००,०००/—रू, २) महिंद्रा केयुव्ही वाहन कं. एमएच ४३ बीजी ७४६९ मध्ये देशी दारूच्या ८०० निपा किं. ८०,०००/—रू. चा दारूचा माल मिळुन आला. सदरचा माल ताब्यात घेवुन वाहन चालक आणि वाहनातील इतर इसम **आरोपी नामे १)** संजय रमेश शिकरवार वय ४७ रा. नारा रोड, नुरी कॉलनी नागपुर, **२)** ईरशाद आलम खुर्शीद आलम वय २२ रा. जाफर नगर नागपुर, **३)** समिर सादिक खान वय २७ रा. सदर न्यु कॉलनी छिंदवाडा रोड नागपुर, **४)** आकाश शंकर गुप्ता वय २६ रा. मानकापुर, रतन नगर नागपुर, **५)** देवेंद्र रामचंद्र शर्मा वय २८ रा. मानकापुर कोराडी रोड नागपुर, यांना अटक करण्यात आली आहे. **चौकशी दरम्यान आरोपीतांनी कबुली दिली की, सदरचे वाहन त्यांनी झुम कार या मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे पैसे देवुन किरायाने घेतले होते.**

सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे नोंद करण्यात आला असुन आरोपीतांकडुन मारोती ब्रिझा वाहन किं. १०,००,०००/—रू, एक महिंद्रा केयुव्ही किं. ६,००,०००/—रू याचे सह ०५ मोबाईल फोन किं. २८,०००/—रू असा **एकुण १८,१३,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात वरोरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील यांचे नेतृत्वात पोउपनि. श्री. विनित घागे, पोना. दिपक दुधे, पोशि. निखिल कौरासे, पोशि. प्रविण यांनी पार पाडली.

———————————————————————————————